28-04-2025-Dai-03a_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/27/2025 10:07 PM Page 1



## निवडक

### राष्ट्रोळी देवाचा ३० रोजी वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २७ :** कोरकणवाडा येथील श्री राष्ट्रोळी देवस्थानचा १० वा वर्धापनदिन दि. ३० एप्रिल व १ मे असा दोन दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. दि. ३० रोजी संध्या ७.३० वा कोरकणवाडा मर्यादित लहान मुलांसाठी वेशभूषा व नाट्य अभिनय स्पर्धा होणार आहे. तसेच २०२३– २४ च्या दहावी, बारावी, पदवी व पदव्युत्तर परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव व बक्षीस वितरण होणार आहे. दि. १ मे रोजी सकाळी १० वाजता श्री सत्यनारायण महापूजा, दुपारी आरती, तीर्थप्रसाद व महाप्रसाद होईल. संध्याकाळी ४ वाजता स्थानिक कलाकारांचे भजन होईल. ७.३० वा श्री राष्ट्रोळी ब्राह्मण कला निकेतन कोरकणवाडातर्फे संगीत सामाजिक 'शिक्षा तुझ्या कपाळी' नाटक सादर होईल. या नाटकाचे दिग्दर्शन सूर्यकांत कोरकणकर, निर्माता आत्माराम कोरकणकर ,संगीत राजू बर्वे, देवेंद्र केपकर, पार्श्वसंगीत अमोल आजगावकर, ध्वनि गुरुदास तारी,वेशभूषा व नेपथ्य प्रवीण म्हामल व सूत्रधार अरुण बांधकर व प्रभाकर बांधकर आहेत. या नाटकात सुनील कोरकणकर, शुभम बांधकर, ऋग्वेद बांधकर, राजेश कोरकणकर, संतोष कोरकणकर, प्रज्योत कोरकणकर, विनोद बांधकर, मनोज कोरकणकर व शारदा शेटकर यांच्या भूमिका आहेत.

---

### पालयेत ३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २७ :** पालये येथील समता युवक मंडळातर्फे देऊळवाडा (श्री भूमिका इंग्लिश स्कूल जवळ) येथे शनिवार, दि. ३ मे रोजी दुपारी ३ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख वक्त्या म्हणून धम्मचारीण गुणमेधा, पुणे (सदस्या त्रिरत्न बौद्ध महासंघ) यांची उपस्थिती असेल. याशिवाय सन्माननीय पाहुणे म्हणून पालये पंच सागर तिळवे, युगनायक संघटनेचे अध्यक्ष मिलिंद माटे, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर समितीचे अध्यक्ष सतीश कोरगावकर, भीमशक्ती सामाजिक संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर वारखणकर, त्रिरत्न बौद्ध महासंघाचे सदस्य धम्मचारी अमोघकेतू, समता युवक मंडळाचे अध्यक्ष अंकुश पालयेकर, दाड साखळेश्वर महिला सेल्फ हेल्प ग्रुपच्या अध्यक्ष कनिष्का पालयेकर, देवस्थान समितीचे अध्यक्ष गोविंद पालयेकर,ज्येष्ठ नागरिक चंद्रकांत पालयेकर यांची उपस्थिती असेल.

---

### पालये महालक्ष्मी देवस्थानचा १ मेपासून वार्षिकोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २७ :** शिरसाट टेंब पालये येथील श्री महालक्ष्मी देवस्थानचा (सिरसाट कुलदेवता ) ४७ वा वर्धापनदिन सोहळा दि. १ व २ मे रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. यानिमित्त १ मे रोजी यजमान बाळकृष्ण शिरसाठ पर्वरी यांच्या हस्ते कुलदेवता श्री महालक्ष्मी देवीला महाभिषेक, नंतर खास पूजा, सकाळी ८ वा नवचंडी अनुष्ठान, पूर्णाहुती, दुपारी १ वाजता महाआरती व महाप्रसाद होईल. दोन्ही दिवशी सकाळी ८ ते दुपारी १२ पर्यंत ओटी भरणे, नवस बोलणे, नवस फेडणे व वर्षासन देणे आधी देवकार्य होतील. संध्याकाळी ७ वा महालक्ष्मी देवीची पालखी मिरवणूक व शिरसाट परिवार मुंबई विभागाकडून सांस्कृतिक कार्यक्रम होईल. दि. २ रोजी यजमान दत्तप्रसाद शिरसाट सावंतवाडी यांच्या हस्ते कुलदेवता श्री महालक्ष्मी देवीला महाभिषेक पूजा होईल. महिला भाविकांतर्फे सकाळी ९ ते दुपारी १२ पर्यंत उत्सव मूर्तीवर कुंकूमार्चन होईल. सर्व भाविकांसाठी ओटी भरणे, नवस बोलणे व नवस फेडणे असे वार्षिक देवकार्ये होईल. दुपारी १२ वाजता, शिरसाट बांधवांची जाहीर सभा होणार आहे. तदनंतर देवीला अर्पण केलेल्या वस्तूंची पावणी ,महाआरती व दुपारी १.३० वा महाप्रसाद व संध्याकाळी ७ वा शिबिकोत्सवने उत्सवाची सांगता होईल. या उत्सवाच्या दोन्ही दिवस पालखी मिरवणुकीवेळी दिंडीचे आयोजन केले आहे. यात सिद्धिविनायक भजन मंडळ (गांधी चौक कुडाळ), कुडाळेश्वर मित्र मंडळ (कुडाळ )यांची दिंडी लाभणार आहे.

# वादळी चर्चेनंतर घरपट्टी दरवाढ कमी करण्याचा निर्णय

## बेतोडा पंचायतीकडून ठराव मंजूर | वाढीव कर अन्यायकारक असल्याचे मत

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. २७ :** बेतोडा – कोनशे – कोडार – निरंकाल पंचायतीने रविवारी झालेल्या ग्रामसभेत घरकर वाढीबाबत झालेल्या वादळी चर्चेनंतर, घरपट्टी दरवाढ कमी करण्याचा ठराव एकमताने मंजूर केला. स्थानिक ग्रामस्थांनी घरपट्टी वाढीचा तीव्र विरोध करताना, वाढीव कर हा त्यांच्या आर्थिक बोज्यावर अन्यायकारक असल्याचे सांगितले.

गेल्या वर्षी घरपट्टीत वाढ करण्यात आली होती. मात्र, त्यावेळी ग्रामस्थांचा विश्वास न घेतल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. रविवारच्या ग्रामसभेत दोन तास या मुद्यावर सखोल आणि वादळी चर्चा झाली. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनी आपल्या समस्या मांडल्यानंतर अखेर पंचायतने वाढीव घरपट्टी कमी करण्याचा निर्णय घेतला.

नवीन ठरावानुसार, झोपड्यांसाठी वार्षिक ७० रुपये घरपट्टी आकारला जाणार आहे. चिरेबंदी घरासाठी प्रति चौ.मी. ५ रुपये, आरसीसी घरांसाठी प्रति चौ.मी. १२ रुपये, व्यावसायिक स्थळांसाठी प्रति चौ.मी. ५० रुपये, कृषी आधारित उपक्रमांसाठी प्रति चौ.मी. २० रुपये, औद्योगिक प्रकल्पांसाठी प्रति चौ.मी. २०० रुपये आणि कचऱ्याच्या विल्हेवाटीकरिता वार्षिक २०० रुपये आकारण्यात येणार आहेत.

ग्रामस्थ हेमंत सामंत यांनी सांगितले की, वाढीव घरपट्टीचा परिणाम सर्वसामान्य शेतकरी कुटुंबांवर मोठ्या प्रमाणात झाला होता. आमच्या पंचायतीचे अर्थकारण मुख्यत्वे शेतीवर आधारित असून, वर्षातील काही महिन्यांमध्येच उत्पन्न मिळते. त्यामुळे ग्रामस्थांच्या मागणीचा विचार करून घरपट्टी कमी करण्याचा निर्णय आवश्यक होता, असे त्यांनी नमूद केले.

सरपंच मधू नाईक यांनी सांगितले की, ग्रामसभेने सर्वानुमते घरकर कमी करण्याचा ठराव मंजूर केला असून, तो बीडीओ कार्यालयाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवण्यात येणार आहे. मागील ग्रामसभेत केवळ ३९ नागरिक उपस्थित असताना वाढीव दर मंजूर झाले होते, तेव्हा विरोध झाल्याचे रेकॉर्डवर नव्हते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी अन्य प्रलंबित विकासकामांवरही ग्रामस्थांनी चर्चा केली. मुख्य रस्त्याचे हॉटमिक्स कार्पेटिंग, गटारांची सफाई, बेकायदेशीर बांधकामे या विषयांबरोबरच एका महिलांनी तिच्या घराशेजारील धोकादायक झाड तातडीने तोडण्याची मागणी केली.यावेळी सरपंचांनी माहिती दिली की, बेतोडा गावातील रस्त्याचे हॉट मिक्सिंग काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात येईल, जेणेकरून खराबी टाळता येईल.

# मडगावमध्ये बेकायदेशीर अड्ड्यांचा पर्दाफाश

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २७ :** काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात सुरक्षेच्या चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर गोवा पोलिसांनी मडगाव शहरात शोध मोहीम राबवली असून, त्यामध्ये अनेक धक्कादायक बाबी उघडकीस आल्या आहेत.

मडगावचे पोलिस निरीक्षक सूरज सामंत यांनी शहरात कार्यरत असलेल्या बेकायदेशीर अड्ड्यांचा पर्दाफाश केला आहे. त्यांच्या या खुलाशानंतर स्थानिक नेते प्रभाव नाईक आणि 'मडगावचो आवाज' या सामाजिक गटाने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

याबाबत बोलताना नाईक यांनी मडगावमध्ये वाढत्या अराजकतेबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली. शहरातील अनेक बेकायदेशीर घरे, जिथे असामाजिक प्रवृत्तींची वस्ती असल्याचे निदर्शनास आले आहे, यांची माहिती स्थानिक प्रशासनाकडे नसल्याची बाब त्यांनी उघड केली.

ही परिस्थिती अत्यंत धोकादायक आहे. जर वेळेवर योग्य उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, तर देव देखील आपल्याला वाचवू शकणार नाही,असा इशारा नाईक यांनी दिला. पोलिस निरीक्षक सूरज सामंत यांच्या धैर्याचे कौतुक करताना त्यांनी मडगावच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून या उघडकीस आलेल्या माहितीचे महत्त्व अधोरेखित केले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या बेकायदेशीर घरांमध्ये राहणाऱ्या काही व्यक्तींवर गुन्हेगारी कारवायांमध्ये सहभागी असल्याचे आरोप आहेत. या पार्श्वभूमीवर नाईक यांनी मडगावच्या नागरिकांच्या सुरक्षिततेबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. तसेच, मडगाव नगरपरिषदेने अद्याप कोणतीही ठोस कारवाई न केल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

'मडगावचो आवाज' गटाने याआधीही सातत्याने या समस्यांकडे लक्ष वेधले आहे. नाईक यांनी सांगितले की, शहराच्या सुरक्षेसाठी आणि शाश्वत विकासासाठी गटाकडून उपाययोजनांचे नियोजन केले जात आहे.

# बेतालभाटी ग्रामसभा तापली ; पोलिसांचा हस्तक्षेप

■ टीम दैनिक हेराल्ड




**मडगाव, दि. २७ :** बेतालभाटी येथील रविवारी झालेली नियमित ग्रामसभा गोंधळात पार पडली. प्रारंभी वैयक्तिक टीकेवरून सुरू झालेला वाद काही क्षणांतच उग्र झाला, त्यामुळे सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला.

बैठकीदरम्यान एका ग्रामस्थाने सरपंच अँथनी फर्नांडिस यांच्या प्रकृतीवर थेट टिप्पणी केली. यावर सरपंचांनी तीव्र प्रतिक्रिया दिली, परिणामी सभागृहात वातावरण तापले आणि काही काळासाठी बैठक थांबवावी लागली. वाढत्या तणावामुळे ग्रामसभेचा कारभार सुरळीत पार पाडण्यासाठी पोलिसांची मदत घेण्यात आली.

या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर गावात अलीकडेच लावण्यात आलेल्या एका साइनबोर्डच्या वैधतेवरही प्रश्न उपस्थित करण्यात आला. सदर फलकावर लिहिले आहे:

*सावध रहा : या गावाने आपली संसाधने संपवली आहेत. वाहून नेण्याची क्षमता ओलांडली आहे. बिल्डर्स, प्रवर्तक, विकासक, आमच्या गावात स्वतःच्या जोखमीवर जमीन खरेदी करा.*

या संदर्भात स्पष्टीकरण देताना सरपंच फर्नांडिस म्हणाले, ही सूचना गावकऱ्यांच्या चिंतेचे प्रतीक आहे. पंचायत कोणालाही कायदेशीररित्या जमीन खरेदीपासून रोखू शकत नाही. मात्र, हा फलक अनियंत्रित विकास आणि संसाधनांच्या मर्यादित क्षमतेबद्दलचा इशारा आहे, जो ग्रामसभेत मंजूर झालेल्या ठरावानंतर लावण्यात आला आहे.

ग्रामसभेत कचरा व्यवस्थापनाच्या मुद्द्यावरही चर्चा झाली. सरपंचांनी माहिती दिली की, मे महिन्यापासून घरोघरी दररोज कचरा संकलन सुरू करण्यात येणार आहे. तसेच कचरा वर्गीकरणासाठी आवश्यक जागा मिळवण्यासाठी पंचायत प्रयत्नशील आहे.

आम्ही अनेक जमीनमालकांशी संपर्क साधला. प्रारंभी सर्वांनी नकार दिला, मात्र एका मालकाने जागा देण्यास सहमती दर्शवली. दुर्दैवाने, आता त्या प्रस्तावालाही काही ग्रामस्थांकडून विरोध होत आहे, असे फर्नांडिस यांनी सांगितले.

याशिवाय बेतालभाटी समुद्रकिनाऱ्यावर आठवड्याच्या शेवटी वाढणाऱ्या कचऱ्याच्या समस्येवरही विशेष चर्चा झाली. ग्रामस्थांनी सांगितले की, शनिवार–रविवारच्या पिकनिकसाठी येणारे पर्यटक मोठ्या प्रमाणावर कचरा फेकतात. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी कठोर उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली.

गोंधळ आणि व्यत्यय असूनही, ग्रामसभेने स्वच्छता, कचरा संकलन आणि जनजागृतीसंबंधी महत्त्वाचे ठराव मंजूर केले. मात्र, या गोंधळाने गावातील विकास, प्रशासन आणि पर्यावरणीय शाश्वततेबाबत वाढत चाललेली दरी अधोरेखित केली.



साखळी : रवींद्र भवनात सौर ऊर्जा प्रकल्पाच्या कामाचा शुभारंभ करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत रवींद्र भवनचे पदाधिकारी.

# साखळी रवींद्र भवनच्या वीजबिलात सव्वा लाखांची बचत होणार

टीम दैनिक हेराल्ड

▶ महिन्याभर रवींद्र भवन सौरऊर्जेवर : मुख्यमंत्र्यांनी केला कामाचा शुभारंभ

**डिचोली, दि. २७ :** साखळी रवींद्र भवनवर गोवा एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सीतर्फे बसविण्यात येणाऱ्या सौरऊर्जा युनिट बसविण्याच्या कामाचा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. गोव्यात सौरऊर्जा प्रकल्प बसविणारे साखळी रवींद्र भवन गोव्यातील पहिले रवींद्र भवन ठरणार असून यामुळे महिन्याला सुमारे सव्वा लाख रुपये बचत होणार आहे. एका महिन्यात काम पूर्ण करून गोवा घटक राज्य दिनी ३० मे रोजी उद्घाटन करण्याचा संकल्प असल्याचे रवींद्र भवनचे उपाध्यक्ष दत्ताराम चिमुलकर यांनी सांगितले.

रवींद्र भवनला सध्या सुमारे अडीच लाख रुपये मासिक वीज बिल येते. मात्र, या सौर ऊर्जेच्या प्रकल्पानंतर सुमारे सव्वा लाख रुपये बिलाची बचत होणार असून निश्चितपणे पन्नास टक्के नफा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सकाळच्या सत्रात निर्माण होणारी ऊर्जा आम्ही ग्रीडला देणार असून ग्रीडमार्फत आम्हाला मासिक किंवा वार्षिक पद्धतीने त्याची किंमत मिळण्यास मदत होणार असल्याचे ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सौर्य ऊर्जा वापरासाठी अनेक योजना आखलेल्या असून गोवा राज्याने विविध माध्यमातून त्याची अंमलबजावणी करावी हा आमचा हेतू आहे. अनेक ठिकाणी असे प्रयोग करण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

राज्यातील जी रवींद्र भवने आहेत त्यात साखळी रवींद्र भवनने हा पहिला प्रकल्प सुरू करून संपूर्णपणे सौरऊर्जेवर चालणारे पहिले रवींद्र भवन म्हणून लौकिक प्राप्त करण्याच्या दिशेने वाटचाल केल्याबद्दल त्यांनी अभिनंदन केले.

वीज बचतीच्या अनुषंगाने सौरऊर्जेचे प्रकल्प अतिशय माफक दरात तसेच उत्पन्न प्राप्त करणारे असल्याने सवलतीच्या दरात उपलब्ध होणारे प्रकल्प गोमंतकीय जनतेच्या वेगवेगळ्या उद्योग तसेच घरोघरी सुरू करण्याच्या दृष्टीने लोकांनी योगदान द्यावे असे आवाहन यावेळी मुख्यमंत्र्यांनी केले.

मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सुमारे ६० लाख रुपये खर्च करून महिन्याभरात साकारणाऱ्या रवींद्र भवनातील सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी रवींद्र भवनचे पदाधिकारी तसेच भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते

# दवर्ली,नेसाय रेल्वे क्रॉसिंगवरील 'उड्डाणपूल' रेंगाळले

## अजूनही भूसंपादनाच्या कचाट्यात | दशकभर जुना प्रकल्प पुन्हा चर्चेत

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. २७ :** सासष्टी तालुक्यातील दवर्ली आणि नेसाय रेल्वे क्रॉसिंगवरील दीर्घकाळ प्रलंबित असलेले उड्डाणपूल प्रकल्प अद्यापही भूसंपादनाच्या अडचणीत अडकले आहेत. अलीकडेच झालेल्या पाहणीतही प्रत्यक्ष कामाची कोणतीही ठोस प्रगती झाल्याचे संकेत मिळाले नाहीत.

राज्यसभा खासदार सदानंद तानावडे यांनी नावेली आमदार उल्हास तुयेकर आणि दवर्ली सरपंच साईश राजाध्यक्ष यांच्यासमवेत दवर्ली रेल्वे क्रॉसिंगची पाहणी केली. या पाहणीमुळे दशकभर जुना प्रकल्प पुन्हा चर्चेत आला आहे. या प्रकल्पाची भूमिपूजन समारंभपूर्वक घोषणा करण्यात आली होती, मात्र प्रत्यक्षात कोणतीही कामगिरी झालेली नाही.

तानावडे यांनी भूसंपादन प्रक्रियेला गती देण्यासाठी राज्य सरकारवर दबाव टाकण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, या प्रकल्पाच्या बाबतीत मागील अनेक वर्षांपासून प्रशासनाच्या कामगिरीचा ढिसाळ इतिहास लक्षात घेता स्थानिक अधिकाऱ्यांमध्ये आणि रहिवाशांमध्ये साशंकता कायम आहे.

दवर्ली उड्डाणपूल प्रकल्प सुमारे एक दशकापूर्वी माजी केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांच्या कार्यकाळात प्रस्तावित झाला होता. सुरुवातीला काही प्रमाणात गती मिळाल्यानंतर, आवश्यक भूसंपादन न झाल्यामुळे प्रकल्प रखडला. कोकण रेल्वेचे अधिकाऱ्यांनीही निधीची कमतरता नसल्याचे स्पष्ट केले होते, मात्र जमीन संपादनाच्या अपयशामुळेच कामात अडथळा निर्माण झाला.

तातडीची गरज असलेला हा प्रकल्प सध्या स्थानिक भाजप नेत्यांच्या पाठपुराव्यामुळे पुन्हा चर्चेत आला आहे. पाहणीनंतर तानावडे यांनी स्पष्ट केले की, क्रॉसिंगच्या दोन्ही बाजूंनी जमीन संपादन केल्याशिवाय उड्डाणपूलाचे बांधकाम शक्य नाही. दररोज ८० वेळा बंद होणाऱ्या रेल्वे क्रॉसिंगमुळे दावर्ली गावातील नागरिकांना प्रचंड गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे.

दरम्यान, शेजारील साओ जोस अरियल गावालगतच्या नेसाय रेल्वे क्रॉसिंगवरही अशीच परिस्थिती आहे. रेल विकास निगम लिमिटेडने पोलिस संरक्षणाखाली डबल ट्रॅकिंगचे काम पूर्ण करून पाच वर्षांचा काळ उलटला असतानाही उड्डाणपूलाचे काम सुरू झालेले नाही. नेसाय येथे एक वर्षांपूर्वी भूमिपूजन झाले होते, मात्र प्रत्यक्ष काम अद्याप सुरू झालेले नाही.

अधिकारक्षेत्राच्या गोंधळामुळे नेसायमधील प्रकल्पास विलंब होत आहे. रेल विकास निगम लिमिटेडने अलीकडेच स्पष्ट केले की उड्डाणपूल उभारण्याची जबाबदारी दक्षिण पश्चिम रेल्वेच्या एका विभागावर आहे. या नोकरशाहीच्या खेळामुळे वर्षानुवर्षे दिली जाणारी आश्वासने निष्फळ ठरली आहेत.

वेळ्ळी आमदार क्रूझ सिल्वा यांनी आरियल गावातील नागरिकांच्या तक्रारी मांडताना सरकारच्या प्राधान्यक्रमांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी स्पष्ट केले की, नवीन रेल्वे स्टेशनच्या विकासावर भर दिला जात असतानाही, नेसाय रेल्वे क्रॉसिंगवरील वाहतूक समस्या दूर करण्यासाठी आवश्यक असलेला उड्डाणपूल अद्याप साकारलेला नाही. सिल्वा यांनी सरकारकडे दवर्ली आणि नेसाय या दोन्ही ठिकाणच्या प्रकल्पांना तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली.

# काँग्रेस सेवा दलाची दहशतवादी हल्ल्यातील बळींना श्रद्धांजली

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २७ :** काँग्रेस सेवा दलाने त्यांच्या राष्ट्रीय कार्यक्रमाअंतर्गत रविवारी जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील निष्पाप बळींना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी मडगावमधील नावेली येथे एक भव्य ध्वजारोहण समारंभ आयोजित केला. या हल्ल्यात अनेक निष्पाप पर्यटकांचा बळी गेला होता.

यावेळी मडगाव काँग्रेस ब्लॉकचे संयोजक सावियो कुतिन्हो यांच्या उपस्थितीत भारतीय राष्ट्रीय ध्वज फडकवण्यात आला. या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

आपल्या भाषणात कुतिन्हो यांनी सांगितले की, हा कार्यक्रम केवळ श्रद्धांजली अर्पण करण्याचा नाही, तर महात्मा गांधी आणि पंडित नेहरू यांच्या मूलभूत मूल्यांची पुनः पुष्टी करण्याचा एक उपक्रम आहे. विशेषतः धर्मनिरपेक्षता आणि बहुलवाद, हे मूल्य भारतीय अस्मितेचे मूलभूत आधार आहेत, असे त्यांनी म्हटले.

दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध करत, कुतिन्हो यांनी सांगितले की, पहलगाममधील निष्पाप बळींनी प्रत्येक भारतीयाला दुःखी केले आहे. दहशतवादाचा सामना करताना आपल्याला एकजूट राहण्याची आवश्यकता आहे. अशा घटनांचा वापर कोणत्याही प्रकारे समुदायांमध्ये द्वेष निर्माण करण्यासाठी किंवा फूट पाडण्यासाठी न करता, आपल्याला एकजुटीने उत्तर द्यावे लागेल.

त्यांनी पुढे सांगितले की, ध्वजारोहण हा राष्ट्राची एकता आणि सामर्थ्याचे प्रतीक आहे. काँग्रेस सेवा दलाच्या या कार्यक्रमाद्वारे आम्ही दहशतवाद आणि अतिरेकीवादाला पराभूत करण्यासाठी एकता हे आपले सर्वोत्तम शस्त्र आहे, असा संदेश देत आहोत, असे ते म्हणाले.

काँग्रेस पक्षाने राष्ट्रीय स्तरावर इतर विरोधी पक्षांसह सरकारला दहशतवादाच्या विरोधात एकजूट राहून काम करण्याचा पूर्ण पाठिंबा दिला आहे, असे त्यांनी नमूद केले. त्याचप्रमाणे, अधिकाऱ्यांना तातडीने कारवाई करण्याचे आणि पहलगाम हल्ल्याला जबाबदार असलेल्या आरोपींना न्याय मिळवून देण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात राजन घाटे, प्रदीप नाईक आणि एन. नामशीकर यांच्यासह इतर अनेक नेत्यांनी आपले विचार मांडले. त्यांनी संकटाच्या काळात राष्ट्रीय एकतेच्या महत्त्वावर जोर दिला आणि शांतता, सौहार्द व न्यायाच्या प्रति काँग्रेस पक्षाच्या वचनबद्धतेची पुष्टी केली.कार्यक्रमाच्या शेवटी, दहशतवादी शक्तींच्या विरोधात खंबीरपणे उभे राहून सतर्क व एकजूट राहण्याचे आवाहन करण्यात आले, आणि देशातील निष्पाप बळींच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करण्यात आला.

